आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

६ जानेवारी २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- देशात HMPV संसर्गाच्या ३ रुग्णांची नोंद, राज्यात एकही रुग्ण नसल्याचा सरकारचा निर्वाळा

- रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकर गाठायला मदत होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- चांदीसाठी हॉलमार्किंग बंधनकारक करण्याचा विचार करण्याची ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांची सूचना

**आणि**

- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी केलेल्या भूसुरुंग स्फोटात ९ जवान शहीद

**<><><><><>**

देशातल्या ह्युमन मेटान्यूमो व्हायरस एचएमपीव्हीच्या एकूण रुग्णांची संख्या ३ झाली आहे. बेंगळुरूमध्ये ३ महिन्यांची मुलगी आणि ८ महिन्यांच्या मुलामधे, तर अहमदाबादमध्ये २ वर्षाच्या मुलात एचएमपीव्हीचा संसर्ग आढळला आहे. अहमदाबाद इथं मुलाला सर्दी-खोकल्याची लक्षणं, तर बेंगळुरूतल्या दोघांनाही ब्रॉन्कोन्यूमोनियाचा त्रास होता. तिघांचीही प्रकृती स्थिर असून बाधित रुग्णांपैकी कोणीही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही. एचएमपीव्हीशी संबंधित श्वसनाच्या आजारांची प्रकरणं विशेषत: चीन, मलेशिया आणि विविध देशांमध्ये आढळत आहेत.

राज्यात अद्याप या विषाणूचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही, असं आरोग्य विभागानं स्पष्ट केलं आहे. एचएमपीव्हीबाबत दक्षतेसह सर्दी-खोकल्याच्या

रुग्णांचं सर्वेक्षण सुरु केलं असून खबरदारीचा उपाय म्हणून, श्वसनविकाराच्या संसर्गापासून आपला बचाव करण्यासाठी नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असं आरोग्य विभागानं म्हटलं आहे. याविषयी लवकरच केंद्र सरकार दिशानिर्देश जारी करणार आहे. त्यांची अंमलबजावणी राज्यात करु, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं….

**होल्ड - फडनवीस**

एचएमपीव्ही हा नवा विषाणू नसून तो भारतातल्या फ्लू विषाणूचा भाग आहे, त्यामुळे बहुसंख्य भारतीय लोकांमध्ये याविरोधात प्रतिकारशक्ती निर्माण झालेली आहे, असं आरोग्य तज्ज्ञांनी सांगितलं. यामुळे गंभीर आजार होण्याची शक्यता कमी आहे. सामान्यत: एचएमपीव्हीच्या लक्षणांमध्ये खोकला, ताप, सर्दी आणि श्वास लागणं यांचा समावेश आहे. एचएमपीव्ही विषाणू सर्वप्रथम नेदरलँडस् मध्ये २००१ मध्ये आढळला होता.

**<><><><><>**

देशात HMPV विषाणूची बाधा झालेले रुग्ण आढळल्याचा विपरीत परिणाम देशातल्या शेअर बाजारांवरही आज झाला आणि दोन्ही निर्देशांक मोठ्या प्रमाणात आपटले. सेन्सेक्स १ हजार २५८ अंकांनी घसरुन ७७ हजार ९६५ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३८९ अंकांनी घसरुन २३ हजार ६१६ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

गेल्या दशकभरात भारतीय रेल्वेचा चेहरामोहरा बदलला आहे. रेल्वेच्या प्रगतीमुळे विकसित भारताचं उद्दिष्ट लवकर गाठण्यात मदत होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनं आज दूरस्थ पद्धतीनं केली, त्यावेळी ते बोलत होते.

**होल्ड प्रधानमंत्री**

(पायाभूत सुविधांचा विकास, प्रवाशांना आधुनिक सोयी सुविधा देणं, रेल्वेचं देशभरातील जाळे अधिक वाढवणं, आणि या सर्वांमधून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणं अशा चार मार्गांनी भारतीय रेल्वेचा विकास करण्याचं सरकारच धोरण असल्याचं त्यांनी सांगितलं.)

काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत दळणवळण आणि पायाभूत सुविधा विकासाला चालना देणाऱ्या या प्रकल्पांमधे नव्या जम्मू रेल्वे विभागाचं आणि तेलंगणातल्या नवीन चार्लापल्ली टर्मिनसचं उद्घाटन, तसंच पूर्व किनारपट्टी रेल्वेच्या ओडिशातल्या रायगडा रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली. देशातल्या तीन राज्यांमध्ये विकसित होत असलेल्या या प्रकल्पांच्या माध्यमातून देश जोडला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी भाषणात सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पपूर्व चर्चेसाठी आठवी बैठक नवी दिल्लीत घेतली. आजच्या बैठकीत विविध संबंधित घटकांच्या प्रतिनिधींसह कामगार संघटनांचे प्रतिनिधी देखील सहभागी झाले होते.

**<><><><><>**

ग्राहकांच्या मागणीनंतर चांदी आणि चांदीच्या वस्तूंसाठी हॉलमार्किंग बंधनकारक करण्याचा विचार करण्याची सूचना ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी भारतीय मानक ब्युरोला केली आहे. नवी दिल्लीत भारतीय मानक ब्युरोच्या ७८ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. भारतीय मानक ब्युरोनं त्याच्या स्थापनेपासून विविध क्षेत्रांमध्ये मानके तयार करणं, त्याची अंमलबजावणी करणं आणि प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली

असल्याचंही ते म्हणाले. गुणवत्ता नियंत्रण आदेश क्यूसीओ केवळ ग्राहकांचे संरक्षण करत नाहीत तर भारतीय उद्योगांची जागतिक विश्वासार्हता देखील वाढवतात. देशातल्या वैद्यकीय उपकरणांचा दर्जा सुनिश्चित करण्याचं श्रेय जोशी यांनी भारतीय मानक ब्युरोला दिलं.

**<><><><><>**

खाद्यतेल उत्पादनात स्वयंपूर्णतेचं उद्धिष्टं गाठण्यासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत सर्व राज्यांनी प्रयत्नांना अधिक गती द्यावी, असं आवाहन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत, याबाबत आयोजित बैठकीत बोलत होते. आयातीवरचं अवलंबित्व कमी करण्याच्या भारताच्या महत्वाकांक्षेचा भाग म्हणून या मोहिमेअंतर्गत २०२५-२६ पर्यंत साडेसहा लाख हेक्टर क्षेत्र ऑईलपामच्या लागवडीखाली आणण्याचं उद्धिष्ट आहे. यात काही अडचणी असतील तर त्या दूर करुन, आणि उपलब्ध संसाधनांचा वापर वाढवून लागवडीचं लक्ष्य पूर्ण करण्यावर राज्यांनी भर देणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

पंचायत से पार्लमेंट टू पॉईंट झीरो या कार्यक्रमाचं उद्घाटन लोकसभेचे सभापती ओम बिरला याच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या संविधान सदनात झालं. आत्मनिर्भर भारताचं स्वप्न साकारण्यासाठी तसंच महिलांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सबल बनवण्यासाठी पंचायती राज संस्था महत्त्वाची भूमिका निभावत आहेत असं बिरला यावेळी म्हणाले. केंद्रसरकारच्या कल्याणकारी योजना पंचायती राज संस्थांशी निगडित महिलांमार्फत तळागाळात पोहोचत आहेत, असं महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यावेळी म्हणाल्या. २० राज्यं आणि

केंद्रशासित प्रदेशातल्या मिळून पंचायती राज संस्थांमधल्या सुमारे ५०० महिला प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी झाल्या आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांनी आज केलेल्या हल्ल्यात सुरक्षादलाचे ९ जवान शहीद झाले. बिजापूर जिल्ह्यात जवानांच्या वाहनांजवळ नक्षलवाद्यांनी भूसुरुंगाचा स्फोट घडवला. त्यात ८ जवान, वाहन चालक यांचा मृत्यू झाला. इतर ५ जण जखमी झाले. जखमींपैकी तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. एक जवान बेपत्ता आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. या जवानांचं बलिदान वाया जाणार नाही, पुढच्यावर्षी मार्च पर्यंत देशाला नक्षलवाद मुक्त करण्याचा निर्धार पूर्ण करु, असं गृहमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

केंद्र सरकारनं स्टील उद्योगासाठी उत्पादन आधारित प्रोत्साहन योजना आज सुरू केली. विशेष स्वरुपाचं स्टील हा देशाच्या वृद्धीचा आधारस्तंभ आहे. उच्च दर्जाच्या स्टीलला असलेली मागणी, आयात कमी करायला आणि आत्मनिर्भर भारतासाठी योग्य संधी असल्याचं केंद्रीय स्टील आणि अवजड उद्योग मंत्री एचडी कुमारस्वामी म्हणाले. देशातल्या स्टील उद्योगाला अधिकाधिक सवलती देण्यावर सरकारचा भर आहे. ही योजना अधिक गुंतवणूकस्नेही असल्याचं मंत्रालयाचे सचिव संदीप पोन्ड्रीक म्हणाले. या योजनेअंतर्गत २७ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक, सुमारे १५ हजार नागरिकांना रोजगार आणि अंदाजे ७९ लाख टन विशेष स्टीलचं उत्पादन करण्याचं नियोजन झालं आहे. गेल्या नोव्हेंबरपर्यंत १८ हजार कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आणि साडे ८ हजारांहून अधिक रोजगारांची निर्मिती स्टील उद्योगात झाली आहे.

**<><><><><>**

भारताच्या युवाशक्तीकडे आज सारे जग आशेनं पाहत असून २०४७ मधल्या विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करताना हीच युवाशक्ती भारताचे नेतृत्व करेल, असं नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत राष्ट्रीय छात्रसेनेच्या प्रजासत्ताक दिन शिबिराला आज दिलेल्या भेटीत ते बोलत होते.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ एस जयशंकर आणि अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवान यांच्यात आज नवीदिल्ली इथं बैठक झाली. दोन्ही देशांमधले द्विपक्षीय सहकार्य तसंच क्षेत्रीय आणि जागतिक सहकार्य वाढवण्याच्या संबंधात या बैठकीत चर्चा झाली. भारत अमेरिका भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी सुलिवान यांनी वैयक्तिक पातळीवर केलेल्या प्रयत्नांची डॉ जयशंकर यांनी आपल्या समाजमाध्यमवरच्या पोस्टमध्ये प्रशंसा केली आहे. भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनीदेखील नवी दिल्लीत सुलिवान यांची भेट घेतली.

**<><><><><>**

अमेरिकेच्या समुद्र किनाऱ्यावर तेल किंवा नैसर्गिक वायूच्या उत्खननावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी बंदी जाहीर केली आहे. अमेरिकेच्या काही भागाचा, समावेश आहे. भावी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या निवडणूक प्रचारात अमेरिकेच्या पेट्रोलियम गरजांसाठी देशांतर्गत उत्पादन वाढवण्याच आश्वासन दिल होत.

**//<><><><><>//**